# पुणे महानगरपालिका

## * स्थायी समिती *

## कार्यपत्रिका क्रमांक ४५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २१/१/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. २०६७**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा-कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे डिसेंबर २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप-१/५७९९ दि.१०/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०६८**

उप आयुक्त, (परिमंडळ क्र. ५) कार्यालयाचे नियंत्रणाखालील भवानी, बिबवेवाडी, कसबा-विश्रामबागवाडा, महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयांकडील माहे डिसेंबरे २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ-५/९३२२ दि. १५/१/२०२० चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. २०६९**

मा.ॲड्.अब्दुल गफुर अहंमद पठाण यांचे दि.१५/१/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेस मिळकत कराच्या माध्यमातून विविध विकास कामांसाठी जास्त प्रमाणात तरतूद उपलब्ध होत असते. मागील अनेक वर्षापासून या मिळकत कराच्या थकबाकीत वाढ होताना दिसत आहे व या थकबाकीवर दंड व शास्तीच्या रकमेमुळे मोठ्या प्रमाणात थकबाकी मध्ये वाढ झाली आहे. सदर मिळकतदारांची थकबाकी वसुल करणेकामी विशिष्ट कालावधीसाठी दंड व शास्तीच्या रक्कमेवर सुट देवून थकबाकी वसुल करण्यासाठी मिळकत कर अभय योजना सुरू करण्यात यावी.

**विषय क्र. २०७०**

मा.सौ.अल्पना वरपे यांचे दि.१६/१/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र. १० क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, | | |
| १) १४.अग्निशामक पथक, पान क्र. ११२, अ.क्र. ६, शहरात अग्निशामक केंद्र बांधणे व विविध विकास कामे करणे (यादी एसजे ३३), पान क्र. २५४, अ.क्र. ३, प्रभाग क्र.१० क मधील सर्व्हे नं. ७७/२ (वेदभवन सोसायटीजवळ) मधील अग्निशामक केंद्रासाठी आरक्षित असलेल्या जागेवर सदर केंद्र विकसीत करणे | २० लाख | --- |
| २) बजेट कोड सीई२२अे७०४१/एसजे-२०-४२२, प्रभाग क्र. १० क भुसारी कॉलनी स.नं. १५० येथील ॲमिनिटी स्पेसवर व्यायामशाळा बांधणे व मैदान विकसित करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) प्रभाग क्र.१० क भारतीनगर येथील पुजा पार्क शेजारी नाल्यापर्यंत पावसाळी लाईन टाकणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. १० क सिध्देश सोसायटी समोरील स.नं. ९८ मधील पुणे मनपाच्या ताब्यात असलेली ओपन स्पेस विकसित करणे | --- | १० लाख |

| | | |
|---|---|---|
| ३) प्रभाग क्र. १० क लोहिया आय.टी.पार्कमधील स.नं. ९८ मधील पुणे मनपाच्या ताब्यात असलेली ओपन स्पेस विकसित करणे | --- | १० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. २०७१**

मा.प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे यांचे दि.१६/१/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र. १४ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक यादी क्र.ST7, पान क्र.२०६,अ.क्र.३, बजेट कोड सीई२०बी१०८/एसटी७-१०३,प्रभाग क्र.१४ क मधील रेव्हेन्यु कॉलनी येथे सद्य:स्थितेत वाहनतळासाठी आरक्षित पुणे महानगरपालिकेची मालकी असलेल्या जागेवर बहुमजली वाहनतळ उभारणे. | ५० लक्ष | - |
| | नविन सुचविलेली कामे- | | |
| १. | प्रभाग क्र. १४ क मधील महिलांना शिवणयंत्र पुरविणे. | - | २० लक्ष |
| २. | प्रभाग क्र. १४ क मध्ये फर्गुसन कॉलेज रस्ता येथे विविध सुशोभिकरणाची कामे करणे. | - | २० लक्ष |
| ३. | प्रभाग क्र. १४ क मध्ये विविध ठिकाणी व्यायामशाळा साहित्य पुरविणे. | - | १० लक्ष |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. २०७२**

मा.ॲड्.अब्दुल गफुर अहंमद पठाण यांचे दि.१६/१/२०२० चे पत्र.

पुणे पेठ कोंढवा खुर्द, कौसरबाग परिसरातील स.नं.११ मधील भालदार बिल्डिंग ते संपन्न हॉटेल पर्यंतचा रस्ता ६ मी.रूंदी असून सदर रस्ता ९ मीटर रूंदीचा कलम २१०अन्वये आखण्यात येवून मंजूर करण्यात यावा.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. २०७३**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६ डिसेंबर २०१९ ते दि.३१ डिसेंबर २०१९ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/पक्र.१/९४४ दि.१०/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०७४**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि.१६/१२/२०१९ ते दि.३१/१२/२०१९ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/पक्र.४/९४५ दि.१०/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०७५**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१ डिसेंबर २०१९ ते दि.१५ डिसेंबर २०१९ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/पक्र.१/९४६ दि.१०/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०७६**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि.१/१२/२०१९ ते दि.१५/१२/२०१९ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/पक्र.४/९४८ दि.१०/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०७७**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांकडील दि.१/१२/२०१९ ते दि.३१/१२/२०१९ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप२/९४९ दि.१३/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०७८**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील दि.१६ ते दि.३० नोव्हेंबर २०१९ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परिक्र.५/९६६ दि.१६/१/२०२० चे पत्र.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. २०७९**

पुणे महानगरपालिकेच्या महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय कोंढवा–येवलेवाडी कार्यालयाकडील श्री.बन्सीलाल जगन्नाथ कांबळे, हुद्दा–ड्रेनेज बिगारी यांच्या निलंबन कालावधीची २ री सहामाही दि.४/८/२०१९ ला पूर्ण झाली असल्याने सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/९४३ दि. १०/१/२०२० चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. २०८०**

पुणे महानगरपालिका अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाकडील खराडी गोडाऊन व संगमवाडी गोडाऊन येथे स्थापत्य विषयक विविध कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार श्री लक्ष्मी एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,५९,४८१=२०० पेक्षा १८.४५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २४,१३,४५६=९१ रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास अधिक पुगप मधील जी.एस.टी. (१२%) र.रुपये ३,५६,०८९=१० टेस्टिंग चार्जेस र.रुपये७,९२८/– रॉयल्टी चार्जेस र.रुपये ५४,७२३=६४ अॅटपार दराने अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/९६१ दि.१४/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०८१**

हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभागामध्ये टँकरने पिण्याचे पाणी पुरवठा करणे सन २०१९–२० (भाग ३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार रवि फुडस अॅन्ड बेव्हरेजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पु.ग.प.र.रु.३९,९९,६००/– पेक्षा ०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३९,९९,६००/– पर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/९६७ दि.१६/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०८२**

प्रभाग क्र. १४ ब मधील आपटे रोड, घोले रस्ता परिसरात फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गाजुल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४८,५६,२७२=६० पेक्षा ०.७६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४८,१९,३६४=९३ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,८२,७५२=७१ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये १७,६६७=५० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये३०,७६७/– पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९६८ दि. १६/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०८३**

प्रभाग क्र. १३ ड पेगॅसेस क्लब ते आमची हॉटेल रस्ता येथे पदपथ, प्रकाश व्यवस्था, दुभाजक, सुशोभिकरण इ.कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४४,१०,९९२=७० पेक्षा १% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४३,६६,८८२=७७ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,२९,३१९=१२ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ४९,०४४=९८ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १०,६०५/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९६९ दि.१६/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०८४**

कचराडेपोमुळे पिण्याचे पाणी दुषित झालेल्या व पुणे मनपा मध्ये नव्याने समाविष्ठ फुरसुंगी गावामध्ये दैनंदिन १०० खेपा टँकरने पाणीपुरवठा करणे (सन २०१९-२०) (भाग ३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार जाधव ट्रान्सपोर्ट यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पु.ग.प.र.रु.९९,९७,७७०/- पेक्षा ०.४४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९९,५३,७७९=८१ पर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/९७० दि.१६/१/२०२० चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. २०८५**

पुणे महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत सहा महिने मुदतीकरीता मासिक एकवट मानधन तत्वावर काम करणाऱ्या सेवकांच्या मानधनाबाबत मा.हेमंत रासने व मा.उमेश गायकवाड यांचे दि. १३/११/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४७२ दि. १३/११/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/सविवि/९३४ दि.८/१/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १४/१/२०२० च्या सभेत ठरले होते.)

## संकीर्ण

**विषय क्र. २०८६**

पुणे मेट्रो प्रकल्प टप्पा क्र. १ मार्गिका क्र. २ 'वनाज ते रामवाडी' या मार्गिकेच्या आराखडयामध्ये नळ स्टॉप चौकातील पहिल्या मजल्या पर्यंतचे वाहनांसाठीचे उड्डाणपुलाचे खर्चाबाबत निदर्शनास आणलेल्या मा.स्थायी समिती ठ.क्र.१६०दि.२२.०५.२०१८ अन्वयेच्या ठरावामध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/९४० दि.९/१/२०२० चे पत्र.

१) महाराष्ट्र मेट्रोरेल कॉर्पोरेशन लि. यांना त्यांचेमार्फत नळ स्टॉप चौकात बांधण्यात येणा-या उड्डाणपूलाचा खर्च र.रू.३५,२५,१३,२३६/-(४.५%सुपरव्हिजन चार्जेससहित) अधिक जी.एस.टी सह रक्कम अदा करणेबाबत मा.स्थायी समिती ठ.क्र.१६० दि.२२/०५/२०१८ यामध्ये दुरूस्ती करणेस,

२) महाराष्ट्र मेट्रोरेल कॉर्पोरेशन लि. यांचे समवेत दुरूस्त सामंजस्य करारनामा करणेस.

**विषय क्र. २०८७**

राजीव गांधी प्राणीसंग्रहालय येथील लसुणघास पुरविणे नवीन निविदा कामकाज पुर्ण होईपर्यंत निविदा क्र.९८/२०१७-१८ चे ठेकेदार मे.गुरूराज एंटरप्रायझेस यांचेकडून दि.१४/१/२०१९ ते २७/८/२०१९ या कालावधी मध्ये लसुनघास पुरवठा करून घेतला असून सदर माल पुरवठ्या प्रित्यर्थ त्यांना र.रू.१३,४१,४६८/- अदा करणेस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उदयान/९६५ दि.१६/१/२०२० चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**